# एम्को फाउंडेशनच्या 'परिवर्तन'चा दीक्षांत समारंभ



विद्याधर पानट, रामास्वामी यांच्यासमवेत परिवर्तन उपक्रमात सहभागी विद्यार्थी.

जळगाव । दि. ११

**जळगाव** मनपा तसेच महाराणा प्रताप शाळेतील इ.८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित परिवर्तन या व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा दीक्षांत समारंभ नुकताच गंधे हॉल येथे विद्याधर पानट यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

एम्को फाउंडेशनतर्फे इ.८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी परिवर्तन हा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो. संपूर्ण वर्षभरात ९० मिनिटांच्या सुमारे १५ ते २० तासिकांचा हा संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम महाराणा प्रताप तसेच मनपाच्या तीन शाळांमध्ये एम्को फाउंडेशनच्या स्वयंसेवी प्रशिक्षक माध्यमातून राबविला जातो. यामध्ये विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्याधर पानट यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. तसेच यानिमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

पानट यांनी कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन व सूत्रसंचालन हे विद्यार्थ्यांनीच केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. एम्को फाउंडेशनचे विविध उपक्रम व त्यातून प्रदर्शित होणारी सामाजिक जाणिव याबद्दल त्यांनी एम्को फाउंडेशनच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले. या प्रसंगी प्रसाद सोनवणे, सुपडू जोगी, स्वप्नील जोशी, चुनिलाल राठोड या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नितीन नंदागवळी व श्रीकांत मिश्रा या प्रशिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अशोक खिंवसरा, प्रमोद खिंवसरा, अजित कुचेरिया, डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, एम्को लिमिटेडचे अधिकारी, स्वयंसेवक, विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रास्ताविक एम्को फाउंडेशनचे प्रमुख रामास्वामी यांनी केले. आभार सीमा खरे यांनी मानले.